**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १४ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आज अंतराळ स्थानकातून परतीच्या प्रवासाला.**
2. **छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा गडकिल्ल्यांना जागतिक वारसा म्हणून युनेस्कोची मान्यता मिळाल्याबद्दल आज विधानसभेत आनंदोत्सव.**
3. **राज्यात बळजबरीने धर्मांतर करण्याच्या प्रकरणांचा अभ्यास करणाऱ्या समितीच्या अहवालानुसार लवकरच धर्मांतरविरोधी कायदा आणणार - गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांची विधानपरिषदेत माहिती.**
4. **अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला विजयासाठी** 81 **धावांची गरज.**

-------------------------------------

**ऑक्सिओम-फोर**

**भारतीय अंतराळवीर ग्रुपकॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह ऑक्सिओम-फोर मोहिमेतल्या तीन सहकाऱ्यांच्या परतीचा प्रवास आजपासून सुरू झाला. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी साडेचार वाजता यानाच्या अनडॉकिंगचं नियोजन करण्यात आलं असून, उद्या मंगळवारी दुपारी तीन वाजता हे अंतराळवीर पृथ्वीवर परत येतील. या मोहिमेअंतर्गत १४ दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी विशेष सात प्रयोग केले आहेत. दरम्यान, शुभांशू शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून निरोप घेताना मनोगत व्यक्त केलं. आजचा भारत सर्वात सुंदर दिसत असल्याचं सांगत त्यांनी अंतराळातून भारताला महत्त्वाकांक्षी, निडर आणि आत्मविश्वासाने भरलेला म्हटलं आहे.**

-------------------------------------

**युनेस्को वारसा यादी**

**छत्रपती शिवाजीमहाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाल्याबद्दल आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन**

दिलं. ही दुर्गसंपदा राज्याचा वारसा असून, जागतिक पातळीवर हा मान मिळणं ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. लोककल्याणसाठी तसंच स्वराज्य रक्षणासाठी या किल्ल्यांचं बांधकाम करण्यात आलं असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेवरील विचार काळाच्या पलिकडे असल्याचं मत युनेस्कोच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. राज्यातल्या या किल्ल्यांचा वारसा यादीत समावेश झाल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री, परराष्ट्र मंत्री, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्यासह राज्यातल्या इतर अधिकाऱ्यांचे आभार मानले. युनेस्कोचं हे मानांकन टिकवणं मोठं आव्हान असून, या किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी नागरीकांनी हातभार लावण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

-------------------------------------

**धरणां मधला गाळ-विधानसभा**

राज्यातल्या धरणांमधला गाळ काढण्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल आपल्याकडे सादर झाला असून, त्यातल्या शिफारशींना आपण मान्यता दिली आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितलं. मंजुरीनंतर गाळ काढला जाईल, असं मंत्रिमंडळ बैठकीत ते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले.

*(होल्ड बाईट - कॉग्रेस नेते विजय वडेट्टीवार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)*

*विदर्भातील धरणं जे आता गोसेखुर्द अलीकडे झालेला पण सगळे धरणांमध्ये प्रचंड गाळ मोठ्या प्रमाणात आहे. आपण मामा तलावांचा उपसाह करतो. त्याला काही प्रमाणात निधी देतो आणि त्यामुळे हे पुराचं कारणसुद्धा माननीय मुख्यमंत्री महोदय हे एक मोठं कारण आहे.*

*माननीय अध्यक्ष महोदय मुळात धरणातला गाळ काढण्याच्या संदर्भात आपण त्याचे निकष ठरवायला एक समिती तयार केली होती. आता या संदर्भातले हे निकष माझ्याकडनं मंजूर झालेले आहेत. पुढच्या कॅबिनेटला ते मंत्रीमंडळापुढे येतील आणि मंत्रिमंडळाच्या मान्यतेने पुढची कारवाई त्यात केली जाईल.*

-------------------------------------

**शिवानी दाणी वखरे**

मुख्यमंत्री कार्यालयाने गुंतवणुकीच्या प्रवाहाला गती देण्यासाठी केलेल्या महत्त्वपूर्ण फेरबदलांतर्गत शिवानी दाणी वखरे यांची विदर्भ क्षेत्रासाठी गुंतवणूक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांच्या “विकसित भारत अमृतकाल” या दूरदृष्टीचा एक भाग असून प्रादेशिक नेतृत्व तयार करून विद्यमान आणि संभाव्य गुंतवणूकदारांना मार्गदर्शन करणे हे त्याचं उद्दिष्ट आहे.

------------------------------------

परमिटरूम

नागपुर जिल्हा रेस्टारेंट परमिटरूम असोसिएशन तर्फे शासनाने परमिटरूमवर लावलेला 10 टक्के वॅट टैक्स, वाढवलेली 15 टक्के नुतनीकरण फी, वाढवलेली 65 टक्के एक्साईज ड्युटी या विरोधात आज नागपूरातील संविधान चौक नागपुर येथे धरणे आंदोलन, निदर्शन करण्यात आले. यावेळी एका आंदोलनकर्त्याने आपल मनोदय व्यक्त केल..

*(होल्ड बाईट)*

*मागील दोन वर्षापासून आम्ही शासनासोबत मीटिंग करत आहोत, निवेदन देत आहोत. दरवेळेस आम्हाला फक्त करतो, म्हणून हे अशा प्रकारचे आश्वासन मिळत आहे. १० वर्ष झाली व्हॅट हटला नाही, त्याच्यानंतर सरकारने १५ पर्सेंट आमचे लायसन्स फी वाढवली. लायसन्स फी वाढते ना वाढते तर या महिन्यामध्ये एक्साइज ड्युटी वाढवलेली आहे आणि तेही एवढी भरमसाठ झालेली आहे. ६५ पर्सेंट ती वाढलेली आहे. त्याच्यामुळे काय होणार आहे, परमिटरूमचे धंदे खतम होणार आहे म्हणून आज आम्ही दिवसभर बंद ठेवलेला आहे.*

जिल्हयातील रेस्टारेंट, परमिटरूमधारक, काम करणारे कर्मचारी मोठ्या संख्येने या धरणे आंदोलनामध्ये सहभागी झाले होते .गोंदिया जिल्हयात देखील आज व्यापारी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

------------------------------------

पंकज भोयर-विधान परिषद

राज्यात बळजबरीन धर्मांतर करण्याच्या प्रकरणांचा अभ्यास करण्यासाठी पोलीस महानिरीक्षकांची समिती आधीच कार्यरत असून या समितीच्या अहवालानुसार राज्य सरकार लवकरच धर्मांतरविरोधी कायदा आणेल, अशी ग्वाही गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिली. आमदार उमा खापरे यांनी दौंड जिल्ह्यातल्या केडगाव इथल्या पंडिता रमाबाई मुक्ती मिशन संस्थेत शिकणाऱ्या मुलींवर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती होणं, त्यांच्याशी चुकीची वर्तणूक या प्रकरणी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक पदावरच्या महिला अधिकाऱ्याची समिती

नेमण्यात आली असून तिचा अहवाल एका महिन्याच्या आत सादर होईल आणि त्यानंतर अहवालानुसार संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्याच्या दिशेने योग्य ती कारवाई केली जाईल, असंही त्यांनी नमूद केलं. आमदार प्रवीण दरेकर आणि मनीषा कायंदे यांनी राज्यात धर्मांतराचा मुद्दा अधोरेखित करून याबाबत कठोर कायदा आणण्याची गरज असल्याचं मत व्यक्त केलं आणि देशातल्या अकरा राज्यांमध्ये धर्मांतरविरोधी कायदा असून असा कायदा सरकार पुढच्या अधिवेशनात आणणार का, असा प्रश्न विचारला. त्यावर, मंत्री भोयर यांनी, असा कायदा करणारं महाराष्ट्र हे देशातलं अकरावं राज्य असेल, अशी ग्वाही दिली.

------------------------------------

अमलीपदार्थ

राज्यात अमली पदार्थांच्या विक्रीत वारंवार अटक करण्यात येऊनही जामीनावर सुटणाऱ्या आरोपींना मोक्का लावण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्यात येणार आहे आणि अल्पवयीन आरोपींच वय कायदेशीर कमी करण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. याबाबतच्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. अमली पदार्थांच्या धंद्यात अल्पवयीन मुलांना सामील करुन घेण्यात येते आणि त्यांच्यामार्फत हे पदार्थ विक्री करून कायद्यातून पळवाट काढण्याचा प्रयत्न करण्यात येतो. त्यामुळे कायद्याच्या व्याख्येत बदल करून सोळा वर्षांच्या आरोपींना अटक करण्याची तरतूद करण्यात येईल आणि वारंवार असे गुन्हे करणाऱ्यांना मोक्का लावण्यासाठी कायद्यात बदल करण्यात येईल असं ते म्हणाले. परदेशी नागरिक, विशेषतः नायजेरियन व्यक्ती या गुन्ह्यात सापडतात त्यांना त्यांच्या देशात परत पाठवण्याची तरतूद आहे मात्र त्यातून वाचण्यासाठी ते अन्य छोटे गुन्हे करून इथेच राहतात, केंद्र सरकारला हे लक्षात आणून दिल्यावर त्यांचे हे छोटे गुन्हे माफ करून त्या नागरिकांना त्यांच्या देशात परत पाठवण्यात येईल असंही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

------------------------------------

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट

अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला विजयासाठी 81 धावा करण्याची आवश्यकता आहे लॉर्ड्स मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात इंग्लंडचा दुसरा डाव 192 धावांवर संपला. शेवटच्या वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या 8 गडी बाद 112 झाल्या होत्या. दुसऱ्या डावात भारतातर्फे केएल राहुल वगळता कोणीही विशेष धावसंख्या उभारू शकले नाही, तर यशस्वी

जयस्वाल आणि वॉशिंग्टन सुंदर हे शुन्यावर बाद झाले. इंग्लंड तर्फे जॉफ्रा आर्चर या गोलंदाजांना तीन गडी बाद केले तर, कर्णधार बेन स्टोक्स आणि ब्रायडन कार्स प्रत्येकी दोन गडी बाद केले. आज सामन्याचा अखेरचा दिवस आहे. मालिकेत दोन्ही संघांनी आतापर्यंत प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

-------------------------------------

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरींची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

-------------------------------------

डॉ.शंकरराव चव्हाण जयंती

देशाचे माजी गृहमंत्री, राज्याचे माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. नांदेडमध्ये धनेगाव इथल्या शंकरराव चव्हाण यांच्या समाधीस्थळावर माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. या शिवाय विवीध सरकारी कार्यालय आणि आस्थापनांमध्ये देखील अभावडं करण्यात आले.

-------------------------------------

चलनफुगवटा

गेल्या महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर उणे १३ शतांश टक्क्यांपर्यंत घसरला आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार खाद्यपदार्थ, खनिज तेल, मूलभूत धातूंचे उत्पादन, कच्चं तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत घट झाल्यामुळे ही घसरण झाली आहे.

-------------------------------------